मी हनुमंत रामचंद्र पाटील, वय–७८ वर्षे, व्यवसाय– सेवानिवृत्त शिक्षक, रा. बाम्हणे, ता. शिंदखेडा, जि. धुळे शपथ घेऊन सांगतो की,

**वादीचा शपथेवर उलटतपास प्रतिवादी तर्फे विधीज्ञ श्री. एन. पी. अयाचित यांचे मार्फत –**

१६. हे म्हणणे खरे आहे की, मी सेवानिवृत्त शिक्षक असल्याचे दाव्यामध्ये अथवा पुढे प्रतिज्ञापत्रामध्ये नमुद केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी सन २००८ चे पुर्वी सेवानिवृत्त झालेलो आहे. हे म्हणणे खरे नाही की, युवराज शांताराम आणि निळकंठ हे माझे कुरुकवाडे गावचे नातेवाईक आहेत. प्रस्तुतचा दावा लिहित असतांना त्याबाबतची वकीलांना माहिती ही मी दिलेली होती. त्यावेळेस युवराज शांताराम पाटील व निळकंठ पुंडलिक पाटील हे नातलग आहेत अशी माहिती मी दिलेली नव्हती. दाव्यातील परिच्छेद क्र. २ मधील युवराज शांताराम पाटील व निळकंठ पुंडलिक पाटील हे नातलग असलेबाबतचा मजकुर बरोबर आहे. युवराज शांताराम पाटील व निळकंठ पुंडलिक पाटील हे माझे नातलग आहेत किंवा कसे यापैकी ते माझे नातलग नाहीत ही बाब बरोबर आहे.

१७. मी ज्याबाबत सौदा केला त्याचे ७/१२ उतारे पाहिले होते. हे म्हणणे खरे आहे की, गट नं. ६३२ वर प्रकाश याचेबरोबर इतर हक्कामध्ये कोमलसिंग रणजितसिंग राऊळ यांचे नाव नमुद आहे. सदर व्यवहार कोमलसिंग रणजितसिंग राऊळ यांची संमती घेतली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, वाद मिळकत ही भोगवटादार वर्ग २ ची व प्रतिवादी याची वडिलोपार्जित मिळकत आहे याची मला माहिती आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रकाश याला तीन भाऊ आहेत. सौदयाच्या आधी सदर तीन भावांपैकी कोणाशीही बोलणे झाले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, प्रकाश याच्या एकाचे भाव नाव अरुण नामदेव सुतार असे आहे. हे म्हणणे खरे नाही की, सौदा पावतीमध्ये अरुण याचे नाव लिहिले होते. प्रकाश याला किती मुली आहेत हे मला सांगता येणार नाही. त्याच्या

कोणत्या मुलीचे कधी लग्न झाले ते देखील मला सांगता येणार नाही. मी स्वत:हुन सांगतो की, मुलीच्या लग्नासाठी व्यवहार केला होता. मी सदर मुलीचे नाव काय आहे व कोणाशी लग्न होते आहे याबाबतचा तपास केला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, प्रकाश याच्या सर्व मुलींची लग्ने ही सन २००८ च्या पुर्वीच होवुन गेलेली आहेत. हे म्हणणे खरे आहे की, प्रकाश याचे तिन्ही भाऊ हे कुरुकवाडे येथेच राहतात.

१८. सौदा कुरुकवाडे येथे झाला. जो सौदा झाल्याचे मी सांगत आहे त्याचा कागद कुरुकवाडे येथेच तयार केला. सौदयाकरीता म्हणुन मी कुरुकवाडे गावाच्या बाहेर गेलो नव्हतो. बयानापोटी जे चाळीस हजार दिल्याचे मी सांगत आहे ते मी बँकेतुन काढलेले नव्हते. वीस हजार रुपयांच्या वरती रोख व्यवहार करता येत नाही याची मला कल्पना आहे. सौदयाच्या कागदावर नोटांचे विवरण लिहिलेले नव्हते. मुलीच्या लग्नाबाबत सौदा होत असल्याबाबत सदर कागदामध्ये लिहिलेले होते. तो सौदा ज्या कागदावर लिहिला होता त्या कागदावर तारखेच्या बाबतीमध्ये कोणतीही खाडाखोड झालेली नव्हती.

१९. दावा मिळकतीचा ताबा माझ्याकडे देण्यात आल्याबाबत कोणताही स्वतंत्र दस्त केलेला नाही. पुर्वीच्या दस्तावर ताबा मिळाल्याबाबतची नोंद केलेली होती. हे म्हणणे खरे आहे की, तलाठी दरवर्षी ऑगस्ट महिन्यामध्ये शेताला भेट देवुन कोणाची पिक पाहणी आहे याची नोंद घेत असतात. हे म्हणणे खरे आहे की, सन २०११ पासुन ते २०२४ पर्यंत दावा मिळकतीची पिक पाहणी लागलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझा ताबा दावा मिळकतीवर नसल्याने तशी पिक पाहणी लावण्यात आलेली नाही. दोन्हीही दावा मिळकती हया नवीन शर्तीच्या असल्यामुळे त्यांची विक्री होवु शकत नाही याची मला माहिती आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रस्तुत कामी माझे कोण कोण साक्षीदार असतील हे मी न्यायालयात कळविले नाही. युवराज शांताराम पाटील व निळकंठ पुंडलिक पाटील यांची साक्ष घ्यायची आहे.

२०. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत शेत गट क्र. ६३२ ही प्रकाश याला मुकंद सदा मिस्त्री याचेकडून मिळालेली आहे. दावा मिळकत शेत गट क्र. ६३३ ही प्रकाश याला शंकर बुधा सुतार याच्याकडून मिळाली आहे किंवा कसे हे मला माहित नाही. प्रकाश हा दावा मिळकतींचा मालक कसा झाला याबाबत मी तपास केला नव्हता. प्रकाश याला मुली आहेत किंवा कसे व त्या लग्नायोग्य आहेत किंवा कसे याबाबत मी सौदयापुर्वी तपास केला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी आजपावेतो तलाठी यांचेकडे सन २०११ पासुन माझ्याकडे ताबा असुन तशी पिक पाहणी लावावी असा अर्ज दिलेला नाही. तसा अर्ज कधी दिला होता व त्याचे काय झाले हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझा दावा मिळकतींवर कधीही ताबा नसल्याने मी तसा कोणताही अर्ज आजपावेतो दिलेला नाही. दावा मिळकत हया नवीन शर्तीच्या असल्याबाबत व त्यांच्याबाबत मी सौदा केला असल्याचे महसुल विभागाला मी कळविलेले नाही.

२१. हे म्हणणे खरे आहे की, युवराज शांताराम पाटील व निळकंठ पुंडलिक पाटील यांचेशी माझे संबंध चांगले आहेत. युवराज शांताराम पाटील व निळकंठ पुंडलिक पाटील यांच्याशिवाय कोणालाही साक्षीदार म्हणुन मला कोणालाही तपासायचे नाही.

**(<u>मध्यांतरामुळे उलटतपास तहकुब</u>.)**

(नि. क्र. ८४ वरील अर्जान्वये वादीचा उलटतपास तहकुब.)

श्रवणोत्तर स्वीकृत,

सही/–
(आदित्य घ. नाईक)
दिवाणी न्यायाधीश (क–स्तर),
दोंडाईचा

स्थळ : दोंडाईचा,
दिनांक : ११/०७/२०२५